**कृपया प्रसिध्दीसाठी** **15 एप्रिल 2009**

## भाजपा नेते व भाजपा-शिवसेना व मित्र पक्षांचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री. राम नाईक यांनी बुधवार, 15 एप्रिल 2009 रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

**मुंबई, बुधवार**ः उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाच्या कानाकोपऱ्यातून 'परिवर्तन रथा'वरुन श्री. राम नाईक, तर 'राम नाईक रथा' वरुन अन्य स्थानिक भाजपा-शिवसेना नेते उत्तर मुंबईत परिवर्तन हवे असल्याने मतदारांनी भाजपाला मतदान करावे असे आवाहन करीत आहेत. प्रचाराला आता वीस दिवस पूर्ण झाले असून कालपासून कार्यकर्त्यांनी घरोघर जाऊन श्री. राम नाईक यांच्या कामांची माहिती देणारी पत्रके वाटून प्रचार करण्यास सुरुवात झाली आहे. उत्तर मुंबईत महापालिकेचे 38 विभाग (वॉर्ड) असून त्या सर्व ठिकाणी प्रचाराची पहिली फेरी पूर्ण झाली आहे. भाजपा नेते व भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री. राम नाईक यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यावेळी बोलताना श्री. राम नाईक म्हणाले,"प्रचाराचा दुसरा टप्पा आम्ही काल भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंतीच्या सुमुहुर्तावर सुरु केला असून घरोघरी जाणारे कार्यकर्ते यावेळी जे पत्रक वाटत आहेत त्यामध्ये मी मतदार संघासाठी केलेली निवडक महत्त्वाची कामे तसेच पुढील पाच वर्षांत करावयाच्या महत्वाच्या कामांचा समावेश आहे". श्री. राम नाईक रेल्वे राज्य मंत्री असताना त्यांनी मुंबई रेल्वे विकास महामंडळाची स्थापना करुन एमयूटीपी - एकच्या अंतर्गत मुंबई उपनगरी रेल्वेसाठी रु. 4,500 कोटींची कामे सुरु केली होती. काँग्रेस सरकारच्या राज्यात रेल्वे मंत्री श्री लालूप्रसाद यांनी या सर्व प्रकल्पांकडे दुर्लक्ष करुन त्यांची गती मंदावली तसेच मुंबईकडे सापत्नभावाने पाहिले. उपनगरी रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी हे सर्व प्रकल्प अग्रक्रमाने पूर्ण करुन घेण्यास श्री. राम नाईक सर्वाधिक प्राधान्य देतील. त्याचप्रमाणे एमयुटीपी - दोन अंतर्गत रु.6,300/- कोटींच्या प्रकल्पांवर 2008-09 या गेल्या वर्षात फक्त दहा कोटी रुपये खर्च झाले आहेत. एमयुटीपी - दोनचे प्रकल्पही पूर्ण करुन घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न राहील. मुंबईत चारकोप - वांद्रे - मानखुर्द मार्गावर मेट्रो रेल्वे सुरु करण्याची योजना आहे. त्यासाठी चारकोप येथे कारशेड बांधण्याचा निर्णय काँग्रेस सरकारने घेतला आहे. या प्रस्तावित मेट्रो कार शेडमुळे चारकोप येथून बेघर होण्याची टांगती तलवार असलेल्या 30,000 नागरिकांना संरक्षण मिळवून देण्यासही श्री. नाईक प्राधान्य देतील. तसेच खाजगी वन जमिनीवरील लाखो झोपडपट्टीधारक, चाळकरी व फ्लॅटधारकांना बेघर व्हावे लागू नये यासाठी कसोशीने प्रयत्न करतील. झोपडपट्टी सुधार योजना (SRA) पुन्हा पारदर्शीपणे सुरु करण्याबाबतही श्री. नाईक आग्रही राहतील. उत्तर मुंबईत गोराई, मनोरी,

मार्वे, अक्सा, एरंगळ, मढ वगैरे बंदरात मोठ्या संख्येने मच्छिमार राहातात. त्यांचे वेगळे प्रश्न आहेत. मच्छिमारांना डिझेलवर मिळणारा कर परतावा या सरकारने रद्द केला असून तो प्रती लिटर रु.चार प्रमाणे सर्व छोट्या मच्छिमारांना मिळावा, तसेच मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणेच 4 टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध व्हावे असा श्री राम नाईक यांचा प्रयत्न राहणार आहे, याची माहिती कार्यकर्ते प्रचाराच्यावेळी मतदारांना देतील.

"पत्रकाच्या मलपृष्ठावर जीवनावश्यक वस्तूंचे गेल्या पाच वर्षात बदललेले भाव आम्ही दिले आहेत. दरांचा तो तक्ता वाचताक्षणी मतदारांना पटणारा आहेच पण अशी थेट तुलना बघितल्यावर मतदार भाजपाच्याच बाजूने मतदान करतील याची आम्हाला खात्री आहे. एका बाजूला वाजपेयी सरकारच्या काळातील दरांशी तुलना केली तर गहू, तांदूळ, मूग डाळ, दूध, चहा यांच्या किंमतींमध्ये शंभर टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे तर दुसऱ्या बाजूला तरीही काँग्रेस सरकार महागाई निर्देशांक खाली येऊन 0.45 झाला असल्याचे म्हणते ते कसे असा प्रश्न सुज्ञ मतदाराला पडेलच. केवळ महागाईच गगनाला भिडली आहे असे नाही तर देशभरात मंदीची लाट आली असून 1.25 कोटी लोक बेकार झाले आहेत, 25 लाख लोक अर्धबेकार झाले आहेत हेही कार्यकर्ते नागरिकांच्या लक्षात आणून देतील." असे श्री नाईक म्हणाले. भाजपा सरकार कसे होते आणि आता काँग्रेस सरकार कसे आहे यावर तुम्हीच विचार करा ! योग्य सरकार निवडण्याची तसेच योग्य खासदाराला जिंकून देण्याची हीच वेळ आहे ! असे आवाहनही भाजपा-शिवसेना युती व मित्र पक्षांचे कार्यकर्ते मतदारांना करणार आहेत. मतदारांना विचार करायला लावणारे हे पत्रक आमच्या समर्थनासाठी मतदान करण्यालाही प्रवृत्त करेल, असा विश्वास यावेळी श्री. राम नाईक यांनी व्यक्त केला.

प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात 'परिवर्तन रथा'वरुन प्रचार करताना मतदारांनी जो भरघोस प्रतिसाद दिला त्यावरुन मतदार पुन्हा एकदा विक्रमी मतांनी निवडून देतील असा विश्वास वाटत असल्याचेही श्री. राम नाईक यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला भाजपा-मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी आणि भाजपा-उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. योगेश सागर हेही उपस्थित होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**